कोल्हापूर महानगरपालिका

शहर पाणी पुरवठा विभाग

**- जाहीर प्रसिध्दीकरण -**

मा.आयुक्तसो ा यांचे दिनांक 13/04/2020 रोजी झाले मान्यतेस अनुसरुन कोल्हापूर शहर व शहरालगतच्या सर्व नळ कनेक्शनधारकांना कळविणेत येते की, सन 2019-20 या आर्थिक वर्षामध्ये डिसेंबर-जानेवारी 2019-20 अखेर 5 बिलींग चक्रे पुर्ण झालेली असून फेब्रुवारी-मार्च 2020 या बिलींग चक्राचे रिडींग 01 एप्रिल 2020 पासून सुरु होउन 31 मे 2020 अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून अचानक पुकारण्यात आलेल्या लॉकडाऊनमूळे मिटर रिडर्स यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च 2019-20 या कालावधीतील बिलाची आकारणी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन व रिडींग नोंद करुन आकारणी न करता डिसेंबर-जानेवारी 2019-20 या बिलींग चक्रामध्ये केलेली आकारणी फेब्रुवारी-मार्च 2019-20 या बिलींग चक्राकरीता लागू करुन याकामी ज्यांची मिटर स्थिती (स्टेटस) OK आणि Meter Change या सदराखाली आहे त्यांची बिले "सरासरी" सदराखाली नोंद करुन आकारणी करणेत आलेली असून व ज्यांची मागील आकारणी ही "अडचण, मिटर बंद, कुलूप, मोडतोड, नादुरुस्त, सरासरी, मिटरमध्ये पाणी, रिडींग दिसत नाही" या सदराखाली आहेत त्यांची प्रचलीत नियमानुसार संगणक प्रणालीमार्फत पाणीपट्टी आकारणी करणेत आलेली आहे. सदरची संगणकीकृत बिले कोल्हापूर महानगरपालिकेच्या www.kolhapurcorporation.gov.in या वेबसाईटवर "Know Your Dues" या लिंकखाली प्रसिध्द करुन सदरची बिले ऑनलाईन भरणेबाबत नागरिकांना जाहीर आवाहन करणेत येत आहे. तसेच नागरी सुविधा केंद्रामध्ये मागील कालावधीचे बिल घेऊन गेल्यास बिल भरणा करुन घेणेची सुविधा उपलब्ध करणेत आलेली आहे.

फेब्रुवारी-मार्च 2019-20 या बिलींग चक्राचा कालावधी पुर्ण झालेनंतर एप्रिल-मे 2020-21 या बिलींग चक्रातील पाणी बिले 1 जून 2020 पासून पुर्ववत स्पॉटबिलींग प्रणालीमार्फत जनरेट करणेत येणार आहेत. यावेळी ग्राहकांचा प्रत्यक्ष पाणी वापरातील तफावतीप्रमाणे फरकाची बिले आकारणेची तजविज ठेवणेत आलेली आहे. तरी नागरीकांनी पाणी बिलाची रक्कम भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

जल अभियंता

शहर पाणी पुरवठा विभाग